**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व)
ता. वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० २५२५१०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaiviracorporation@gmail.com

जा.क्र. : व.वि.श.म./निवडणूक/११५७/२०१९-२०
दिनांक : १०/०१/२०२०

## जाहीर दरपत्रक सुचना

सर्व संबंधित शहरातील स्टुडियो धारक, कला व सामाजिक संस्था यांना सदर जाहिर पत्रक सुचनेव्दारे सुचित करणेत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका दि.२६ जानेवारी २०२० ते दि.१० फेब्रुवारी २०२० या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करावयाचा आहे. सदर कालावधीत लोकशाही निवडणूक व सुशासन "जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार !" या थिम व या विषयावर वसई-विरार शहर महानगरपालिका या संपूर्ण क्षेत्रात विविध ठिकाणी रांगोळी प्रदर्शन खालील तक्यात नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहून जनजागृती करावयाची आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | प्रती साहित्य सह रांगोळी दर (साईज ३X४फुट ) सर्व करांसहित |
|---|---|---|
| १ | वसई-विरार शहर महानगपालिका क्षेत्रात दि.२६ जानेवारी २०२० ते दि.१० फेब्रुवारी २०२० या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करावयाचा आहे या संदर्भात लोकशाही निवडणूक व सुशासन "जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार !" या थिम व या विषयावर महानगरपालिकेच्या मुख्य ठिकाणी भव्य रांगोळीचे प्रदर्शन करणे. | |

<u>अटी व शर्ती</u>

१) पुरवठादाराने रांगोळी काढण्याचा अनुभव असल्यास नमुद करावा त्या संबंधीचे दस्तावेज जोडावे.
२) सदर कामासाठी आगाऊ रक्कम अदा केली जाणार नाही..
३) सदर रांगोळी प्रदर्शन महानगरपालिका ठरविल त्या क्षेत्रात सादर करण्याचा दर, आपले लेटर हेड नमुद करून बंद लिफाफयामध्ये दि.१८/०१/२०२० रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत मुख्यालय येथील आवक जावक विभागात सादर करावयाचे आहे.
४) प्राप्त दरपत्रक दि.१८/०१/२०२० रोजी सायं ४:०० वा.उघडण्यात येतील.
५) मालकाचे /संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावी.
६) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्याचा /नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.
७) वरील अटीचे पालन जो पुरवठादार/रांगोळी काढणारी व्यक्ती व संस्था रांगोळीचे प्रदर्शन सादर करणार नाही त्याचे दरपत्रक तपासणी अंती अपात्र ठरविण्यात येईल.
८) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून रु.१००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा लिहून देण्याचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
९) फक्त पत्र निविदाकारांनी सादर केलेल्या किंमतीच्या दरपत्रक विचारात घेण्यात येतील आणि खरेदीचा निर्णय L१ च्या आधारे घेण्यात येतील.
१०) रांगोळी काढण्याचा नमुना पुरवठा दाराने/ठेकेदाराने संबंधित विभागाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.
११) रांगोळी प्रदर्शन अंतीम करण्यापूर्वी संबंधित विभागाकडून त्याचा अभिप्राय घ्यावा त्या अभिप्रायांची माहिती काढण्यात येणाऱ्या रांगोळीमध्ये अंतर्भाव करण्यात यावा.
१२) रांगोळी प्रदर्शन तयार करताना कुठल्याही व्यक्तीचे Copy Right / Trademark इत्यादी उल्लंघन होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठा दारांनी/ठेकेदाराची राहील व तसे झाल्यास ठेकेदार सदरच्या कारवाईस पात्र ठरेल.
१३) सदरचे रांगोळी प्रदर्शन शहरात भरविल्यानंतर त्याचे व्हिडीयो चित्रीकरण करून सॉफ्ट कॉपी महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक राहील.

**सही/-**
**(डॉ.किशोर गवस)**
**उपायुक्त तथा नोडल अधिकारी, निवडणूक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**